# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk10@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


**परिपत्रक**

क्रमांक: 10/एडीएम/पदविका/2017/ 3८५१
दिनांक: 19 AUG 2017

विषय : **शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील पोस्ट एच.एस.सी. प्रथम वर्ष पदविका औषधनिर्माणशास्त्र/ सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी / एचएमसीटी अभ्यासक्रमातील केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत अलॉटमेंट झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थास्तरावर रिर्पोटिंग न झाल्याने प्रवेश प्रक्रियेकरिता एक अंतिम संधी देणेबाबत...**

उपरोक्त विषयाचा अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पोस्ट एच.एस.सी. प्रथम वर्ष पदविका औषधनिर्माणशास्त्र//सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी/एचएमसीटी अभ्यासक्रमातील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तिस-या फेरीपर्यंत अलॉट झालेले प्रवेश अद्यापपर्यंत काही उमेदवारांनी संस्थास्तरावर रिर्पोटिंग केले नसल्याने सदर उमेदवारांचे प्रवेश कर्न्फम करण्यासंदर्भात विनंती अर्ज या संचालनालयास प्राप्त झाले आहेत.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, ज्या उमेदवारांनी काही कारणास्तव प्रवेश निश्चिती केंद्रावर (ARC) प्रवेश निश्चिती शुल्क भरुन प्रवेश निश्चित केला आहे परंतु, प्रत्यक्ष संस्थेत जाऊन निश्चित करू शकले नाहीत किंवा एआरसी केंद्रावर प्रवेश निश्चित केलेले नाहीत त्यामुळे संस्थेतही प्रवेश निश्चित करू शकले नाहीत असे उमेदवार हे केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेतील असल्याने सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन संस्थास्तरावर रिर्पोटिंग करणेबाबत एक अंतिम संधी म्हणुन संबंधित संस्थेने दि. १९.०८.२०१७ ते २०.०८.२०१७ पर्यंत (रविवार सुट्टीत कार्यालय चालु ठेवुन) खाली नमुद केल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करुन संस्थास्तरावरील रिर्पोटिंग करुन घेण्यासाठी या संचालनालयाची मान्यता देण्यात येत आहे. सर्व संबंधित संस्थांनी सदर प्रक्रिया अतिशय काळजीपूर्वक पार पाडावी. सदर प्रकरणी आवश्यकतेनुसार संबंधित विभागीय कार्यालयाचे मार्गदर्शन घ्यावे.

१) केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेतील अंतिम (Latest) अलॉटमेंटनुसार शासकीय व अशासकीय अनुदानित औषधनिर्माणशास्त्र/सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी/एचएमसीटी संस्थेत Seat Type उपलब्ध असल्यास व विनाअनुदानित संस्थेत जागा रिक्त असल्यास त्याच संस्थेत विद्यार्थी प्रवेश घेण्यास इच्छुक असल्यास, विद्यार्थ्यांचा त्याच संस्थेत प्रवेश घेण्यास इच्छुक असल्याचा मुळ अर्ज व आवश्यक त्या मुळ कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर संस्थास्तरावर रिर्पोटिंग करुन घेण्यात यावे.

२) तसेच वरीलपैकी ज्या उमेदवारांनी एआरसी केंद्रावर प्रवेश निश्चित केलेले नाहीत त्यामुळे संस्थेतही प्रवेश निश्चित करू शकले नाहीत अशा उमेदवारांचे संस्थेमार्फत प्रति विद्यार्थी रु. १०००/- (रु. एक हजार फक्त) रोख प्रोसेसिंग फी आकारण्यात यावी. तद्नंतर आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष यांचे नावे (विद्यार्थ्यांच्या Excel मधील इत्यंभूत माहितीची यादीसह) त्यांचा एकत्रित धनाकर्ष (डी.डी.) आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष

यांचेकडे संस्था पाठवतील व त्यांची योग्य ती नोंद ठेवुन त्यांची यादी विभागीय कार्यालयाने पडताळणी करुन या संचालनालयास पाठवतील.

३) सदर प्रवेश over and above होणार नाहीत, यांची दक्षता संबंधित संस्थांनी व विभागीय कार्यालयानी घ्यावी.

४) अशा प्रकारचे केलेले प्रवेश केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत केलेले आहेत असे समजुन सदर विद्यार्थ्यांना केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेचे लाभ लागु राहतील.

५) अनुक्रमांक १ मध्ये नमुद केलेल्या कार्यवाहीनंतर शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थामध्ये शिल्लक असलेल्या जागा शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थामधील चौथ्या फेरीसाठी उपलब्ध राहतील.

६) अशा प्रकारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत संस्थेत अलॉटमेंट झालेल्या उमेदवाराचे प्रवेश निश्चित करण्यासाठी एक अंतिम संधी म्हणुन दि. १९.०८.२०१७ ते २०.०८.२०१७ पर्यंत देण्यात आली असल्याने सदर संधी कोणत्याही कारणास्तव गमावल्यास विद्यार्थी/पालक व संस्था यांना पुनश्च: कोणत्याही सबबीखाली अशी संधी मिळणार नाही.

(चंद्रशेखर ओक) भा.प्र.से.
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

**प्रत:** मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव सादर

**प्रतिलिपी:** १. कार्यासन अधिकारी, आय.टी. सेल, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय मुंबई यांना कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे सदर सूचना विदयार्थी व पालकांच्या माहितीकरीता संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रवेश प्रक्रियेचा अनुषंगाने आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

३. संबंधित प्राचार्य, सर्व पदविका औषधनिर्माणशास्त्र/सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी/एचएमसीटी संस्थांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.